# शिवाजी विद्यापीठ ऑनलाईन पात्रता फॉर्म भरण्याचे आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ ऑनलाईन पात्रता फॉर्म दि. १ सप्टेंबरपासून भरावेत अशा सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. मुदतीत फॉर्म न भरल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असेही पत्रात म्हटले आहे.

विद्यापीठाच्या परिपत्रकात नियमित तसेच बहिस्थ अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. १२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर १ सप्टेंबरपासून विद्यापीठाचे शैक्षणिक सत्र सुरू होत आहे. महाविद्यालयांनी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी दि. १ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर या कालावधीत देण्याची आहे.

# शिवाजी विद्यापीठातील ३२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने टप्याटप्याने निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. दोन दिवसांत ३२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत.

विद्यापीठ प्रशासनाने बुधवारी निकाल जाहीर करण्याचे निर्णय घेतल्यानंतर बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी.सह अन्य १५ अभ्यासक्रमांचे तर शुक्रवारी १७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. उर्वरित अभ्यासक्रमांचे निकालही लवकरच जाहीर करणार असल्याचे परीक्षा विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

# १७ निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून विविध अभ्यासक्रमांच्या प्रथम आणि द्वितीय वर्षांच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया गुरुवार (दि. २०) पासून सुरु झाली. दुसऱ्या दिवशी १७ निकाल जाहीर करण्यात आले. त्यामध्ये बी. ए., बी.पी.एड., आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून त्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. अजून १३९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर होणार आहेत.

Kolhapur Main
Page No. 5 Aug 22, 2020
Powered by: erelego.com

# ऑनलाईन पात्रता फॉर्म भरण्याचे आवाहन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे ऑनलाईन पात्रता फॉर्म दि. १ सप्टेंबरपासून भरावेत, अशा सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. मुदतीत फॉर्म न भरल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येइल, असेही पत्रात म्हटले आहे. विद्यापीठाच्या परिपत्रकात नियमित तसेच बहिस्थ अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. १२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर १ सप्टेंबरपासून विद्यापीठाचे शैक्षणिक सत्र सुरू होत आहे. महाविद्यालयांनी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी दि. १ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर या कालावधीत देण्याची आहे. विलंब शुल्कासह दि. २० ते ३० सप्टेंबर अशी मुदत आहे. विशेष विलंब शुल्क तारीख दि. १ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर अशी करण्यात आली आहे.